लोकमत

# शिवाजी विद्यापीठातर्फे मेघा पानसरे यांचा गौरव

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागाच्या प्रमुख डॉ. मेघा पानसरे यांना 'सिर्गेइ इसेनिन पुरस्कार-२०१९' थिरुवनंतपुरम येथे रशियन दूतावासातर्फे आयोजित रशियन भाषा व साहित्य महोत्सवात प्रदान केला. त्या निमित्ताने कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी विशेष प्रशस्तीपत्र प्रदान करुन डॉ. पानसरे यांचा गौरव केला.

यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, डॉ. मेघा पानसरे यांना सिर्गेइ इसेनिन आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाल्याने शिवाजी विद्यापीठाचा लौकिक वृद्धिंगत झाला आहे. डॉ. पानसरे यांनी आंतरराष्ट्रीय भाषांदरम्यान हा संवादाचा पूल निर्माण करण्यात मोलाची कामगिरी बजावल्याची ही पोचपावती असून, यापुढील काळातही त्यांनी आपले कार्य असेच अखंडितपणे सुरु ठेवावे. त्यांच्या या कामगिरीचा विद्यापीठाला अभिमान असल्याचेही कुलगुरूंनी नमूद केले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आदी उपस्थित होते.



डॉ. मेघा पानसरे यांना सिर्गेइ इसेनिन आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल शिवाजी विद्यापीठातर्फे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी प्रशस्तीपत्र प्रदान केले.

लोकमत

# शिव-पावन प्रेरणा मोहीम उद्यापासून

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना कक्ष आणि देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक महाविद्यालय, चिखली यांच्या वतीने उद्या, शनिवारी व रविवारी (दि. २२) 'पन्हाळा ते पावनखिंड : शिव - पावन प्रेरणा मोहीम' या नावीन्यपूर्ण उपक्रम शिबिराचे आयोजन केले आहे.

या शिबिरामध्ये विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, राष्ट्रीय सेवा योजना संचालक प्रा. डॉ. डी. के. गायकवाड, प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील, प्रा. पोपट माळी यांच्यासह विद्यापीठातील उपकुलसचिव, इतर २० अधिकारी, कर्मचारी यांचा विशेष सहभाग असून कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतून साधारणत: १५० विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी होणार आहेत.

या शिबिराच्या माध्यमातून सहभागी शिबिरार्थ्यांना पन्हाळा ते पावनखिंड या ऐतिहासिक मार्गाबाबतच्या विशेष माहितीसह या मार्गावरील स्वच्छता तसेच शाहिरी पोवाडा अशा कार्यक्रमाच्या माध्यमातून प्रबोधन करण्यात येणार आहे. शिबिराची सुरुवात उद्या, शनिवारी सकाळी साडेसात वाजता पन्हाळा येथून सुरु होऊन सांगता रविवारी (दि. २२) सायंकाळी सहा वाजता पावनखिंड येथे होईल.

# शिवाजी विद्यापीठातर्फे आविष्कार संशोधन महोत्सव

## पदवी स्तरावरील जिल्हास्तरीय फेरी ६ जानेवारीस

- **विद्यार्थी, शिक्षक होणार सहभागी**




**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने आविष्कार संशोधन महोत्सव २०१९-२० चे वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे. पदवी स्तरासाठी प्रथम फेरी दि. ६ जानेवारी रोजी जिल्हास्तरावर घेण्यात येणार आहे. महोत्सवात संलग्नित महाविद्यालयांतील विद्यार्थी व शिक्षकांना आपले संशोधन सादर करता येणार आहे.

पदवी स्तरावरील ही फेरी राजाराम महाविद्यालय (कोल्हापूर), बळवंत कॉलेज (विटा) व बाळासाहेब देसाई कॉलेज (पाटण) या महाविद्यालयांत होईल. महोत्सवात सहभाग घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थांनी प्रवेश अर्ज प्राचार्यांमार्फत संबंधित यजमान महाविद्यालय, अधिविभागाकडे पाठवायचे आहेत. प्रवेश अर्ज विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.unishivaji.ac.in/bcud/Avishkar) व सर्व म हाविद्यालयांत उपलब्ध आहेत.

प्राथमिक फेरीतून निवडलेल्या पदवी स्तरातील विद्यार्थ्यांची द्वितीय फेरी नि. ८ जानेवारी रोजी तंत्रज्ञान अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ येथे होईल. या फेरीतून निवडलेले विद्यार्थी मुंबई विद्यापीठ येथे दि. २८ ते ३० जानेवारी रोजी आयोजित राज्यस्तरीय महोत्सवामध्ये सहभागी होतील. महोत्सवात विद्यार्थी, शिक्षकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, 'आविष्कार' समन्वयक डॉ. शशिभूषण महाडिक यांनी केले आहे.

# शिवाजी विद्यापीठाकडून कबीरपंथीय भजनांचे संकलन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातर्फे कबीरपंथीय भजनांचे संकलन करण्यात येत आहे. दूधगाव येथे कबीरपंथीय भजनाच्या छायाचित्रणास नुकताच प्रारंभ करण्यात आला.

यावेळी डॉ. नंदकुमार मोरे म्हणाले, आष्टा व दुधगाव सारख्या गावामध्ये उत्तर भारतातील संत कबीरांची भजन परंपरा जोपासली जात आहे, ही गोष्ट अभिमानास्पद आहे. दुर्मीळ व दुर्लक्षित लोककला प्रकाराच्या संकलन व संवर्धनाच्या आधारे महाराष्ट्राचे एक समृद्ध सांस्कृतिक चित्र जगासमोर उभे करता येईल.

विद्यापीठातर्फे सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यातील दुलक्षित व दुर्मीळ लोकलाप्रकारांचे संकलन व संवर्धन केले जात आहे. लावणी, तमाशा, जागर, गोंधळ, सोंगीभजन, डहाक, कीर्तन, पिंगळा, वासुदेव, पोतराज, नमन खेळे आदी लोककलाप्रकारांचे संकलन करण्यात आले आहे.

# शिवाजी विद्यापीठातर्फे उद्यापासून पन्हाळा-पावनखिंड : शिव-पावन प्रेरणा मोहीम

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना कक्ष व देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक महाविद्यालय, चिखली यांच्या संयुक्त विद्यमाने २१ व २२ डिसेंबरला पन्हाळा ते पावनखिंड : शिव - पावन प्रेरणा मोहीम या नावीन्यपूर्ण उपक्रम शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिरामध्ये कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, राष्ट्रीय सेवा योजना संचालक प्रा. डॉ. डी. के. गायकवाड, प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील, प्रा. पोपट माळी यांच्यासह विद्यापीठातील उपकुलसचिव तसेच इतर २० अधिकारी, कर्मचारी, कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातून साधारणत: १५० विद्यार्थी, विद्यार्थिनी सहभागी होणार आहेत.

शिबिराची सुरुवात दि. २१ रोजी सकाळी ७.३० वाजता पन्हाळा येथून होऊन सांगता दि. २२ रोजी सायंकाळी ६ वाजता पावनखिंड येथे होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

20 DEC 2019

तरुण भारत

# 'आविष्कार संशोधन' महोत्सवाची पहिली फेरी ६ जानेवारीला

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या आविष्कार संशोधन महोत्सवाचे वेळापत्रक नुकतेच जाहीर झाले आहे. पदवीस्तरावरील प्रथम फेरी ६ जानेवारी रोजी जिल्हास्तरावर घेण्यात येणार आहे. प्राथमिक फेरीतून निवडलेल्या पदवीस्तरातील विद्यार्थ्यांसाठी ८ जानेवारी रोजी द्वितीय फेरी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागात पार पडणार आहे. या फेरीतून निवडले जाणारे विद्यार्थी मुंबई विद्यापीठात २८ ते ३० जानेवारीदरम्यान होणाऱ्या राज्यस्तरीय महोत्सवामध्ये सहभागी होणार आहेत, अशी माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली आहे.

पदवीस्तरावरील कोल्हापूर जिल्ह्याची पहिली फेरी राजाराम महाविद्यालय, सांगली जिल्ह्याची विटा येथील बळवंत कॉलेज तर सातारा जिल्ह्यातील पाटण येथील बाळासाहेब देसाई कॉलेजला यजमानपद मिळाले आहे. यामध्ये पदवी, पदव्युत्तर, एमफिल./पीएचडीसाठी प्रवेश घेतलेले विद्यार्थी परंतु एमफिल, पीएचडी प्राप्त न केलेलेच सहभागी होऊ शकणार आहेत.

**संशोधन प्रकल्पांची विभागणी**

ह्युमन लँग्वेजस, फाईन आर्ट, कॉमर्स मॅनेजमेंट, लॉ, सायन्स, ॲग्रीकल्चर आणि ॲनिमल, इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी आणि मेडिकल ॲन्ड फार्मसी या विषयांत संशोधन प्रकल्पांची विभागणी करण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी आविष्कार समन्वयक डॉ. शशिभूषण महाडिक यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.